# नगर परिषद कार्यालय वणी
# जिल्हा यवतमाळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सविस्तर ई-निविदा सुचना

**ई निविदा सुचना क्रमांक-नपव/वि.वि./नि.सु./ २०३१ /२०२३  दिनांक- २४/०२/२०२३**

मुख्याधिकारी, नगर परिषद वणी जिल्हा यवतमाळ यांचे वतीने खालील कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत/ तत्सम कामाचा अनुभव असलेल्या, जे पूर्व अहर्ता अटी पूर्ण करतील अशा कंत्राटदाराकडून फक्त ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमूना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाइटवर) दिनांक २७ / ०२ /२०२३ पासून पाहावयास उपलब्ध आहे.

कामाचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदा अनामत रक्कम | निविदा किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत पारेषण संलग्न सौर विद्युत संच (Grid connected Solar PV System) (59 kv) | ९४,२३,७६३/- | ९४,३००/- | १,५००/- | ६ महिने |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) अंतर्गत वणी नगर परिषद प्रभाग क्र.०१,०२,०३, व ०६ मध्ये रस्त्यावर सौर पथदिवे बसविणे (१०० नग सौर आधारित पथदिवे) (४० वॅट एल.ई.डी.) | ६७,७१,१००/- | ६८,०००/- | १,५००/- | ६ महिने |
| ३ | अण्णाभाऊ साठे नागरी अ.जा.वस्ती सुधार योजना अंतर्गत आरक्षित प्रभाग क्र.०६,१,११,१२ मध्ये आवश्यक ठिकाणी रस्त्यावर सौर पथदिवे बसविणे | १,८६,२०,५२५/- | १,८६,३००/- | ५,०००/- | ६ महिने |

ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील अ.क्र.१ व २ करिता

| | |
|---|---|
| ऑनलाइन निविदा विक्री | दिनांक २७/०२/२०२३ ते दिनांक ०६/०३/२०२३ दुपारी ०५.०० पर्यंत |
| ऑनलाइन निविदा सादर करणे व निविदा शुल्क अनामत भरणा करणे | दिनांक २७/०२/२०२३ ते दिनांक ०६/०३/२०२३ दुपारी ०५.०० पर्यंत |
| ऑनलाइन निविदा उघडणे | दिनांक ०८/०३/२०२३ सकाळी ११.०० किंवा त्यानंतर |

ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील अ.क्र.३ करिता

| | |
|---|---|
| ऑनलाइन निविदा विक्री | दिनांक २७/०२/२०२३ ते दिनांक १३/०३/२०२३ दुपारी ०५.०० पर्यंत |
| ऑनलाइन निविदा सादर करणे व निविदा शुल्क अनामत भरणा करणे | दिनांक २७/०२/२०२३ ते दिनांक १३/०३/२०२३ दुपारी ०५.०० पर्यंत |
| ऑनलाइन निविदा उघडणे | दिनांक १४/०३/२०२३ दुपारी ०५.०० किंवा त्यानंतर |
| निविदा पूर्व बैठक | दिनांक ०२/०३/२०२३ दुपारी ०२.०० |

**अटी व शर्ती**

१. निविदेच्या शर्ती व अटी महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाइटवर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल.
२. लिफाफा क्र.१ तांत्रिक बोली- B1 नुसार
३. लिफाफा क्र.२ वित्तीय बोली- BOQ
४. ऑनलाइन निविदा भरतांना कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्वर, इलेक्ट्रिकल इत्यादि किंवा अन्य कारणांमुळे अडथळा आल्यास त्यास नगर परिषद जबाबदार राहणार नाही.
५. कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
६. या निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके वरील महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाइट वर उपलब्ध राहतील.

| अ.क्र. | विषय | विवरण |
| --- | --- | --- |
| 1. | पात्रता<br>लिफाफा क्र.1 (तांत्रिक बोली) मध्ये सादर करावयाचे दस्तऐवज | बी-1 नुसार |
| 2. | लिफाफा क्र.2 (वित्तीय बोली) मध्ये सादर करावयाचे दस्तऐवज | निविदा दर (BOQ) |
| 3. | कंत्राटी कर्मचा-या संबंधी | १) सदरच्या कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना लेखी स्वरुपात कळवावे लागेल की, ते नगर परिषद वणीचे कर्मचारी/कामगार नसून ते सदरच्या कंत्राटदाराचे कंत्राटी स्वरुपात नियुक्त केलेले कर्मचारी/कामगार आहेत.<br>२) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचारी/कामगारांकडून लेखी स्वरुपात हमीपत्र घेण्यांत यावे की, ते नगर परिषद वणीचे स्थायी नोकरीबद्दल अथवा नोकरीवर नियमित करण्यांबाबत कोणताही उजर/दावा करणार नाही.<br>३) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना/ कामगारांना नगर परिषद वणीच्या प्राधिकृत अधिका-याचे आदेशाचे तंतोतंत पालन करावे लागेल.<br>४) कंत्राटी कामगारांचे न्यायालयीन वाद त्यांचे कंत्राटदार यांचेशी संबंधित राहील. नगर परिषद वणीचा त्यात कोणताही संबंध राहणार नाही.<br>५) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची वागणुक नगर परिषद वणीचे अधिका-यांशी शालीन असणे आवश्यक आहे. ज्या कर्मचा-यांची वागणुक बरोबर नसल्याचे आढळले. अशा कर्मचा-यांना कामावरुन परत पाठविण्याचे अधिकार नगर परिषद वणीला राहील.<br>६) कंत्राटदाराने नेमून दिलेल्या कर्मचा-यांचे कृत्यामुळे कोणतेही नुकसान भरपाई नगर परिषद वणीला करावी लागल्यास ते कंत्राटदाराकडून वसूल करण्यांत येईल.<br>७) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे वय 20 वर्षापेक्षा कमी आणि 50 वर्षापेक्षा अधिक असू नये.<br>८) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारची मजूर संघटना निर्माण करता येणार नाही किंवा अशा संघटनेत सहभागी होता येणार नाही. तसेच अशा संघटनेचे सदस्यत्व स्विकारता येणार नाही. असे आढळल्यास संबंधित कंत्राटी कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्याचे अधिकार नगर परिषद वणीला राहील.<br>९) कंत्राटदाराला दिलेल्या कंत्राटामुळे शासनाने जर नगर परिषदेवर कोणतेही कर आकारल्यास ते कंत्राटदाराकडून वसूल करण्यांत येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | १०) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना अनियमित हजेरी, वाईट वर्तणूक, कामचुकारपणा, कामात निष्काळजीपणा ईत्यादी आढळून आल्यास तसेच ज्या कर्मचा-याचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्याला परत पाठविण्याचा अधिकार नगर परिषदेला राहील. त्याचप्रमाणे कंत्राटदाराची सेवा ही समाधानकारक नाही. असे आढळून आल्यास मुदतीचे आंत संपुष्टात आणण्याचा अधिकार नगर परिषदेला राहील.<br>११) कंत्राटदाराने नियुक्त केलेले कर्मचारी/कामगार यांची व्यवस्था कंत्राटदाराला करावी लागणार असल्यामुळे कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती संबंधित कंत्राटदाराची राहील. याबद्दलची कोणतीही जबाबदारी नगर परिषदेकडे राहणार नाही.<br>१२) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचारी कामगारांना कार्यवेळात कोणत्याही प्रकारे अपघात/दुखापत किंवा निधन झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी नगर परिषद वणीवर राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.<br>१३) कामावर असतांना कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची/कामगारांनी मद्यपान अथवा अंमली पदार्थाचे सेवन केलेले नसावे. असे आढळून आल्यास त्या कर्मचा-याची नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार नगर परिषद वणीला राहील व कंत्राटदारावर नगर परिषद वणी ठरवेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. |
| 4. | कामाचे स्वरुप | तांत्रिक मान्यते नुसार |
| 5. | महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मधिल कायदेविषयक तरतूदी | १) महाराष्ट्र लेखा संहिता, २०११ व त्यात करण्यांत आलेल्या दुरुस्त्यांमधिल तरतूदी बंधनकारक राहील.<br>२) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधिल सर्व नियम कंत्राटदारास बंधनकारक राहील.<br>३) वेळोवेळी पाणी पुरवठा संदर्भात शासनाद्वारे निर्गमित होणारे अध्यादेश, नियम, तरतूदी बंधनकारक राहील.<br>४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९३(अ) अन्वये निविदा मंजूर झाल्यानंतर रु.१०,००,०००/- पर्यंतचे कामाकरीता रु.५००/- व त्यावरील प्रत्येक लाखाला रु.१००/- याप्रमाणे मुद्रांकावर कंत्राटदारास लेखी करारनामा करुन द्यावा लागेल.<br>५) पाणी पुरवठा संबंधी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे असणा-या कायद्यातील तरतूदी कंत्राटदारास बंधनकारक राहील.<br>६) पाणी पुरवठा योजनेवर काम करणा-या कामगार/ कर्मचारी यांचे वेतना विषयी शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश/ आदेश/ निर्णय कंत्राटदारास बंधनकारक राहतील. |
| 6. | कामाबाबतच्या इतर अटी व शर्ती | १) काम करणा-या कर्मचा-यांना/ कामगारांना सुरक्षिततेची कामे करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.<br>२) कामाचे देय बिलातून नियमानुसार रक्षा राशी, आयकर तसेच शासनाद्वारे वेळोवेळी लावण्यांत येणारे इतर कर कपात करण्याचा अधिकार नगर परिषदेस राहील. नगर परिषदे कडून कपात न केल्यास संबंधित विभागाकडून तशी सुचना आल्यास त्याचा भरणा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.<br>३) कंत्राटदाराला अनुषंगिक कामाची प्रशासकिय व तांत्रिक गुणवत्ता कायम राखण्याची जबाबदारी राहील.<br>४) काम समाधानकारक वाटल्यास कामाची मुदत वाढवुन देण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.<br>५) स्विकृत कंत्राटदारातर्फे कंत्राट सुरु असतांना कोणत्याही स्तरावरील न्यायालयाचे सदर कामास स्थगिती दिल्यास अथवा काम बंद करण्याचे आदेश दिल्यास त्याबाबतची कार्यवाही स्विकृत करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.<br>६) उपरोक्त कामाकरीता आवश्यक लागणा-या अटी व शर्ती मध्ये वाढ करणे किंवा त्यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार नगर परिषदेकडे राखुन ठेवण्यांत आले आहे.<br>७) प्रस्तावित कामाची संपुर्ण रुपरेषा समजून व योजनेवरील सर्व उपांगे प्रत्यक्ष भेट देवुन |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक शहानिशा करुनच दर सादर करावे. दर मंजूरीनंतर कोणतीही तक्रार ऐकल्या जाणार नाही.<br>८) निधीच्या उपलब्धतेनुसार बिल प्रदान करण्यात येईल.<br>९) बी-1 मधील अटी व शर्ती लागू राहतील. |

**(निखील धुळधर)**
प्रशासक
नगर परिषद वणी

**(अभिजित वायकोस)**
मुख्याधिकारी
नगर परिषद वणी